# ८७ वे नाट्य संमेलन २००७.
## कणकवली

या वर्षीचे ८७ वे अ.भा. मराठी नाट्यसंमेलन शनिवार दिनांक २८ एप्रिल २००७ व रविवार दिनांक २९ एप्रिल २००७ रोजी कणकवली येथे ज्येष्ठ अभिनेत्री श्रीमती लालन सारंग यांच्या अध्यक्षतेखाली संपन्न झाले. दि. २७ एप्रिल २००७ रोजी सायंकाळी निघालेली शोभा यात्रा अनेक नामवंत कलाकारांसह कणकवलीमधील हजारोंच्या संख्येने आलेल्या रसिकांमुळे भव्य अशीच होती. अग्रभागी असलेले घोडेस्वार, महिलांनी फुगडीचा धरलेला फेर, पारंपारिक वेशात आलेल्या शाळकरी चिमुरडया मुली, रस्त्यांवर काढलेल्या आकर्षक रांगोळ्या आणि अनेक मान्यवर, नामवंत कलाकारांचा उत्स्फूर्त प्रतिसाद यामुळे ही दिंडी न भूतो न भविष्यती अशीच झाली होती.

दि. २७ एप्रिल रोजी सायंकाळी स्थानिक कलावंताच्या गीतरामायण या कार्यक्रमाने संमेलनाच्या पूर्वसंध्येला सुरुवात झाली. त्यानंतर स्थानिक कलावंतांनी विविध कार्यक्रम सादर केले.

शनिवार दि. २८ एप्रिल रोजी सकाळी ठीक १०.३० वा. नाटयसंमेलनाच्या उद्घाटन सोहळयाला सुरुवात झाली. कलाकारांनी सादर केलेल्या नांदीनंतर परिषदेचे प्रमुख कार्यवाह श्री. प्रदीप कबरे यांनी प्रास्ताविकात नाट्य परिषदेच्या कार्याचा अहवाल सादर केला. स्वागताध्यक्ष मा.ना.श्री. नारायणराव राणे यांच्या स्वागतपर भाषणानंतर नाट्य परिषदेचे अध्यक्ष श्री. मोहन जोशी आणि उपाध्यक्ष श्री. हेमंत टकले यांनी उपस्थित मान्यवरांना शाल, श्रीफळ आणि स्मृतिचिन्ह देऊन सत्कार केले. उद्घाटक मा.ना.श्री. विलासराव देशमुख, नाटयसंमेलनाचे मावळते अध्यक्ष मा. प्रा. दत्ता भगत, नियोजित अध्यक्षा मा.श्रीमती लालन सारंग आदी मान्यवरांनी नटराज पूजन व दीपप्रज्वलन केले.

उद्घाटक मा.ना.श्री. विलासराव देशमुख यांनी आपल्या अभ्यासपूर्ण भाषणात रंगभूमीच्या अभिवृध्दीसाठी आपला पाठींबा जाहीर केला. त्यानंतर मावळते नाट्य संमेलनाध्यक्ष मा.प्रा. दत्ता भगत यांनी नवनिर्वाचित अध्यक्षा मा. श्रीमती लालन सारंग यांचे अध्यक्षा झाल्याबद्दल अभिनंदन करुन त्यांच्या भावी वाटचालीस शुभेच्छा दिल्या व संमेलनाध्यक्षपदाची सूत्रे प्रदान केली.

नाट्य परिषदेचे अध्यक्ष श्री. मोहन जोशी यांनी आपले मनोगत व्यक्त करताना कलाकारांना व तंत्रज्ञाना कायमस्वरुपी निवारा मिळण्यासाठी भूखंड देण्याची विनंती केली व नाट्य परिषदेच्या कार्याचा आढावा घेतला.

श्री. भालचंद्र मुणगेकर, सदस्य केंद्रीय नियोजन आयोग, भारत सरकार, मा.ना.श्री. सुनिल तटकरे, अन्न व नागरी पुरवठा मंत्री, महाराष्ट्र राज्य, पद्मश्री मधु मंगेश कर्णिक, श्री. विनोद तावडे, विधानपरिषद सदस्य इत्यादि मान्यवरांची भाषणे झाली. आपल्या अध्यक्षीय भाषणात संमेलनाध्यक्षा श्रीमती लालन सारंग यांनी नाट्य चळवळीचा आढावा घेतला.

नाट्य परिषदेचे उपाध्यक्ष हेमंत टकले यांनी उपस्थित मान्यवरांचे आभार मानले.

नाट्य संमेलनात कमलाकर सारंग रंगमंच, रघुवीर तळाशीलकर नाटयमंच, बाबी नालंग मुक्तमंच, चिं. त्र्यं. खानोलकर रंगमंच, मामा वरेरकर रंगमंच या पाच रंगमंचावरुन कार्यक्रम सादर करण्यात आले.

उद्घाटन समारंभानंतर सायंकाळी पाच वाजता कमलाकर सारंग रंगमंचावर 'कोकण विकासाची दिशा'